**ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१९/प्र.क्र.०८(भाग-२)/नवि-७,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

**प्रस्तावना :-**

ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी शासनास पाठवून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची विनंती केली आहे. ठाणे हा जिल्हा महाराष्ट्रातील तिसरा क्रमांकाचा औद्योगिकरण झालेला जिल्हा आहे आणि तो मुंबई महानगर प्रतिष्ठेचा भाग आहे. तसेच ठाणे जिल्हा मुंबईच्या नजिक असल्याने तो जवळपास मुंबईचा एक भागच बनलेला आहे. गेल्या काही दशकात ठाण्यामध्ये नागरीकरणाची प्रचंड वाढ झाली आहे. ठाणे शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे तसेच ठाणे भागाची वाढती वाहतूक सुविधेची गरज भागविण्यासाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह मोबिलीटी प्लॉन (CMP) मध्ये ठाणे अंतर्गत वर्तुळाकार सार्वजनिक जलद वाहतूक प्रणालीची शिफारस करण्यात आली आहे. सदर शिफारस केलेल्या वाहतूकीची लांबी २९ कि.मी. असून त्यावर २२ स्थानके प्रस्तावित आहे CMP मधील प्रवासी वाहतूकीच्या अंदाजानुसार मेट्रो मार्गिकेची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांनी मेसर्स राईटस यांच्या सल्लाने सविस्तर प्रकल्प अहवाल ठाणे महानगरपालिकेने डिसेंबर, २०१८ मध्ये मंजूर केला आहे. ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाची ठाणे महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुषंगाने सदर प्रकल्पाच्या प्रस्तावास राज्य शासनाकडून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**०२. शासन निर्णय :-**

ठाणे महानगरपालिकेने सादर केलेला ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाची (लांबी २९ कि.मी. व २२ स्थानके (उन्नत २० + भूमीगत २) रुपये १३०९५ कोटी खर्चाचा प्रकल्प ठाणे महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करण्यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांनी मेसर्स राईटस यांच्यामार्फत अंदाजित केलेल्या ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाकरिता रु.१३०९५ कोटी प्रकल्प पूर्णत्वाच्या खर्चाच्या सोबतच्या परिशिष्ट क्र.१ व २ मध्ये तपशील नमूद केलेला भांडवली खर्च असलेल्या प्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

२) ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी विशेष हेतू वाहन कंपनीमार्फत राबवावयाच्या वित्तीय आराखडयानुसार (परिशिष्ट-३) आर्थिक सहभागातून भागभांडवल उभारुन त्यामधील कर्जाचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, या अटीवर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्पासाठी राज्यशासनाच्यावतीने समभाग म्हणून रु.१५०७ कोटी, भूसंपादन व पुनर्वसन याकरिता रु.२७११ कोटी बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज व प्रारंभिक शुल्क रु.२१ कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहाय्य म्हणून रु.२०० कोटी असे एकूण रु.४४३९ कोटी ठाणे महानगरपालिकेने देण्याबाबत ठाणे महानगरपालिकेस निदेश देण्यात येत आहेत.

४) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या कराच्या ५० टक्के रु.४२८ कोटी आणि राज्य स्तरीय कर रु.६८७ कोटी असे एकूण रु. १११५ कोटी राज्य शासनाकडून व्याजासहित परतफेड करावयाचे दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे समभाग रु. १५०७ कोटी व केंद्र शासनाच्या करांच्या ५० टक्के रु. ४२८ कोटी केंद्रशासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज असे एकूण रु.१९३५ कोटी केंद्रीय सहाय्य मिळविण्याकरिता केंद्रशासनाकडे विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी पत्रव्यवहार करण्यास ठाणे महानगरपालिका/महामेट्रो यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७) ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी ठाणे, नागपूर आणि पुणे मेट्रोच्या धर्तीवर केंद्र आणि राज्य शासन यांच्या विशेष हेतू वाहन महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) मार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन देणे ही जबाबदारी ठाणे महानगरपालिकेची राहील. सदर प्रकल्पाच्या कामात भूसंपादन ही बाब प्रकल्पाच्या प्रगतीतील अडथळा ठरणार नाही, याची नोंद ठाणे महानगरपालिकेने घेण्याबाबत ठाणे महानगरपालिकेस निदेश देण्यात येत आहेत.

९) सदर प्रकल्पाकरिता द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थेमार्फत अल्प व्याज दराचे कर्ज घेण्यास व सदर कर्जाचे मुद्दल व व्याज याचा कोणताही भार राज्यशासनावर येणार नाही या अटीवर ठाणे महानगरपालिका/महामेट्रोस प्राधिकृत करण्यात येत आहे.

१०) ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो मार्गाची अंमलबजावणी 'मेट्रो कायदा २००९ (सुधारित)' नुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११) ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो मार्गांच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये अथवा प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, ठाणे महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१२) ठाणे शहरातील सर्व मेट्रो मार्गिकांच्या भाडे दरात एक वाक्यता रहावी म्हणून ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वेचे सुरुवातीचे भाडे दर हे मुंबई मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मार्गिकेच्या भाडे टप्पे व दराप्रमाणे पुढीलप्रमाणे सुरुवातीचे भाडेदर ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अंतर (कि.मी.) | ० - ३ | ३ - १२ | १२ - १८ | १८ - २४ | २४-३० | ३० - ३६ | ३६ - ४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भाडे (रु.) | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

सदर भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी गरज भासल्यास ते मुंबई मेट्रो -४ वडाळा-घाटकोपर- मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मार्गाच्या अस्तित्वात असलेल्या भाडेदराप्रमाणे आवश्यक बदल करण्याचे अधिकार ठाणे महानगरपालिका/महामेट्रो यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद घेण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात येत आहे.

१३) सदर प्रकल्पासाठी बाह्यसहाय्यीत कर्ज ठाणे महानगरपालिका/महामेट्रोमार्फत घेतल्यास व सदर कर्ज सहाय्यासाठी राज्यशासनामार्फत हमी देण्याची आवश्यकता भासल्यास, सदर कर्जाचे कोणतेही दायित्व राज्यशासनावर येणार नाही, या अटीवर राज्यशासनाकडून हमी देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

१४) ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो मार्ग वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमीनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क / विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) सदर मार्गिकेमध्ये बाधीत होणाऱ्या नागरीकांचे पुनर्वसन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नागरी पुनरुत्थान योजनेच्या नियमानुसार योजनेंतर्गत ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१६) ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो मार्ग हा प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१७) सदर प्रकल्पाकरिता द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थेमार्फत घेतल्या जाणाऱ्या कर्जाच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/ठाणे

महानगरपालिका यांची राहील  त्यामुळे शासनावर अतिरिक्त भार येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी, याबाबत ठाणे महानगरपालिकेस/महामेट्रोस निर्देश देण्यात येत आहेत.

१८) सदर प्रकल्पाच्या अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची  कार्यवाही करण्यास ठाणे महानगरपालिका/महामेट्रोस निर्देश देण्यात येत आहेत.

१९) राज्यशासनाचा समभाग व भूसंपादन व पुर्नवसन व पुर्नवसाहतीकरण खर्च ठाणे महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर प्रकल्पाकरिता केंद्रशासनासोबत करावयाच्या त्रिपक्षीय करारात ठाणे महानगरपालिकेस देखिल चौथा पक्ष म्हणून घेण्यास केंद्रशासनास विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही याची दक्षता घेण्यास ठाणे महानगरपालिका/महामेट्रो यांना निर्देश देण्यात येत आहेत. तसेच न्यायीक बाबीमुळे अथवा इतर अनुषंगिक वा अन्य कोणत्याही बाबींमुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्यास सदर वाढीव खर्चाची जबाबदारी ठाणे महानगरपालिकेची राहील, असे ठाणे महानगरपालिकेला निर्देश देण्यात येत आहेत.

२२) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्यसहाय्यीत कर्जाची जबाबदारी प्रामुख्याने ठाणे महानगरपालिकेची असल्याने ठाणे महानगरपालिकेने त्यांचे पत मुल्यांकन करुन घेण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

२३) सदर प्रकल्पामधून मिळणारा आर्थिक परतावा या बाबीवर या प्रकल्पाची आर्थिक वर्धनक्षमता अवलंबून असल्याने या गृहितकांबाबत ठाणे मनपा व महामेट्रोने स्वतंत्र अभिप्राय घेण्यात यावेत.

२४) सदर प्रकल्पास राज्यशासनाने सदर प्रस्तावात मान्य केलेल्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात येणार नाही, याची नोंद ठाणे मनपाने घ्यावी.

२५) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणारे बाह्यसहाय्यित कर्जाची त्याच्या मुद्दल व व्याजासह  संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/ठाणे महानगरपालिका यांनी परतफेड करावी तसेच सदर कर्जाचे कोणतेही दायित्व राज्यशासनावर येणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी.

२६) मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार ठाणे महानगरपालिका/महामेट्रो यांना देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२७) सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधुन उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी, भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्य व

देखभाल (O&M) इ. साठी प्रकल्प अंमल बजावणी संस्था /महामेट्रोस वापरण्यास देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.३१/१९/१४४४ दिनांक २.०३.२०१९ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. ८४/२०१९ दिनांक ०७.०३.२०१९ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०८१९०९१६५३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRAM DATTATRAYA YADAV

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=50cb0ce4cc4fe54c74f42b860354e86ec00b3b36f5f215c9f7658e611006a200, ou=URBAN DEVELOPMENT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2019.03.11 11:13:46 +05'30'

**( श्रीराम यादव )**

उप सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१७. सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१८. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.

२०. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
२१. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) नागपूर.
२२. व्यवस्थापकिय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
२३. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
२४. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
२५. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., मुंबई.
२६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लि., मुंबई.
२७. विभागीय आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे.
२८. पोलिस आयुक्त, ठाणे.
२९. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
३०. जिल्हाधिकारी, ठाणे
३१. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३२. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३३. महाव्यवस्थापक, ठाणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, ठाणे.
३४. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३५. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
३६. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३७. कार्यासन अधिकारी (नवि-२३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३८. निवड नस्ती (नवि-७).

(नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१९/प्र.क्र.०८(भाग-२)/नवि-७, दिनांक ०८ मार्च, २०१९ चे सहपत्र)

## परिशिष्ट १

ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाची ठळक वैशिष्टये

(अ) मेट्रो रेल स्टॅंडर्ड गेज : १४३५ मी.मी.

(ब) मेट्रो मार्गिका लांबी

| वर्तुळाकार मार्गिका | उन्नत कि.मी. | भुयारी कि.मी. | एकूण लांबी कि.मी. |
|---|---|---|---|
| नवीन ठाणे ते नवीन ठाणे (वर्तुळाकार मार्ग) | २६ | ३ | २९ |

(क) प्रस्तावित मेट्रो अलाईनमेन्टसाठी नियोजन केलेल्या जागेची विभागणी :-

| अ.क्र. | जागेचे क्षेत्र विकास आराखडयाप्रमाणे | एकूण लांबी कि.मी.मध्ये | शेरा |
|---|---|---|---|
| १. | एच.सी.एम.टी.आर. | ६.०० | |
| २. | डी.पी. रस्ते | १८.१७ | |
| ३. | आरक्षण व इतर | ४.८३ | भुयारी मार्गासह |
| | एकूण | २९.०० | |

(ड) प्रवाशी वाहतूकीचा अंदाज -:

| वर्ष | प्रति तास प्रतिदिशा प्रवासी संख्या | दैनिक प्रवास संख्या (लाख) |
|---|---|---|
| २०२५ | २३,३२० | ५.७६ |
| २०३५ | २९,४८९ | ७.६१ |
| २०४५ | ३१,३९३ | ८.७२ |

(इ) मेट्रो स्टेशन नियोजन :-

| वर्तुळाकार मार्गिका | उन्नत स्टेशन | भुयारी स्टेशन | एकूण स्टेशन |
|---|---|---|---|
| प्रस्तावित नवीन ठाणे ते नवीन ठाणे (वर्तुळाकार मार्ग) | २० | २ | २२ |

सदर मेट्रो मार्गिकेवर एकूण २२ मेट्रो स्टेशनपैकी दोन स्टेशन भूमिगत असून उर्वरित स्टेशन हे उन्नत राहतील. सदर स्टेशन हे दिव्यांग, वयोवृध्द यांना वापरण्यास सोयीचे असते. तसेच स्टेशन परिसरात पार्किंगची सोय राहील. सदर मार्गिकेवर नवीन ठाणे, रायला देवी, वागळे चौक, लोकमान्य नगर बस डेपो, शिवाई नगर, निलकंठ टर्मिनल, गांधीनगर, डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृह, मानपाडा, डोंगरीपाडा, विजय नगरी, वाघबिळ, वॉटर फ्रन्ट, पाटलीपाडा, आझादनगर बस स्टॉप, मनोरमानगर, कोलशेत औद्योगिक क्षेत्र, बाळकुम नाका,बाळकुम पाडा, राबोडी, शिवाजी चौक, ठाणे स्टेशन अशी स्थानके प्रस्तावित आहेत.

**(ई) कार डेपो :-**

ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता मौजे वडवली येथील एकूण ४९.५० हेक्टर क्षेत्रातील जागेवर कार डेपो आरक्षण प्रस्तावित आहे. कासारवडवली डेपो येथे १८ हेक्टर जागेमध्ये सुविधा पुरविण्यात येतील. यामध्ये स्टॅबलिंग लाईनसाठी ४१ मार्गिका असतील.

**

## परिशिष्ट २

**ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाचा भांडवली खर्च :**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | पुर्नवसन व पुर्नवसाहत खर्चासह भूसंपादन | २७११.१८ |
| २. | संरेखन व घडण | १२९३.१८ |
| ३. | स्थानक इमारत (स्थापत्य काम, EM works, ECS, TVS, उद्वाहन, सरकते जिने व स्थापत्यशास्त्रासंबंधी कामे इत्यादी) | १५६७.१८ |
| ४. | डेपो (स्थापत्य, EM works, मशनरी व प्लॉन्ट व इतर सामान्य कामे) | २२६.१४ |
| ५. | मुख्य मार्ग, डेपो व डेपो कन्क्टीव्हीटीसाठी कायमस्वरुपी मार्ग | ३१८.२० |
| ६. | मुख्य मार्ग व डेपोसाठी ट्रक्शन व विद्युत पुरवठा (OHE, ASS, GIS etc.) | ४३६.२९ |
| ७. | सिग्नलिंग व टेलिकॉम (AFC, Platform screen doors, CCHS इत्यादिसह) | ६२२.२२ |
| ८. | पर्यावरणात्मक खर्च | १०.४० |
| ९. | किरकोळ खर्च युटिलिटीज, रोड वर्क्स, टोपोग्रोफिक्स सर्व्हे, जिओटेक्नीकल इनव्हेस्टिगेशन, बॅरिकॅडिंग, ट्री कटिंग अॅन्ड रिप्लॉटींग, इतर स्थापत्य कामे जसे की, सिग्नेज इन्व्हीरॉनमेन्टल प्रोटेक्शन अॅन्ड ट्रॉफिक मॅनेजमेन्ट | २३९.५० |
| १०. | सुरक्षिततेसाठी भांडवली खर्च (स्थापत्य व EM works सह) | ८.३२ |
| ११. | कर्मचाऱ्यासाठी निवासस्थाने व इमारती (स्थापत्य, विद्युत कामे व हरित इमारत संकल्पना) | १२२.०४ |
| १२. | ठाणे मेट्रोसाठी गाडया | १४६६.१० |
| १३. | एकूण खर्चाच्या २ टक्के इंटर मॉडेल इंटेग्रेशनवरील भांडवली खर्च यामध्ये पादचाऱ्यासाठी फूटपाथ, फिडर बसेस व सायकली (जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत व मेट्रो गाडयांचा खर्च वगळून) | १२६.१९ |
| १४. | जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत वगळून इतर सर्व बाबींवरील खर्च | ६४३५.७७ |

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १५. | जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत वगळता इतर सामान्य खर्च<br>(अ) डिझाइन चार्जेस<br>(आ) स्थावर मालमत्ता सल्लागारावरील खर्च<br>(इ) डिजीटल प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट प्लॅटफॉर्म ५डीबीआयएम<br>(ई) एएफसी ऑन बोर्ड एजन्सी<br>(उ) मेट्रो भवन इमारत (स्थापत्य व ईएम वर्क्स) | ३२४.६२ |
| १६. | एकूण सर्व बाबींवरील खर्च सामान्य खर्चासह | ६७६०.३९ |
| १७. | आकस्मित खर्च ३ टक्के जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्च वगळता | २०२.८१ |
| आकस्मित खर्चासह एकूण (जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्च वगळून) | | ६९६३.२० |
| आकस्मित खर्चासह एकूण (जमिन संपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्चासह) | | ९६७४.३८ |
| केंद्रीय वस्तु व सेवा कर व मुलभुत जकात शुल्क | | ६७५.९५ |
| राज्यस्तरीय वस्तु व सेवा कर | | ५४२.४८ |
| एकूण खर्च कर व शुल्कासह | | १०८९३ |
| ५ टक्के भाववाढ गृहित धरुन प्रकल्प पुर्णत्वाची एकूण किंमत | | १३०७४.०० |
| बांधकामाच्या कालावधीचे व्याज व प्रारंभिक शुल्क | | २१.०० |
| एकूण | | १३०९५.०० |

**

**परिशिष्ट -३**

**ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पातील आर्थिक सहभाग**

| तपशील | आर्थिक सहभाग (रु.कोटीत) | टक्केवारी |
|---|---|---|
| १. केंद्रशासनाचे समभाग | १५०७ | १५.५८% |
| २. राज्य शासनाचे समभाग* (ठाणे महानगरपालिकेचे सहाय्य) | १५०७ | १५.५८% |
| ३. केंद्रीय कराकरिता राज्यशासनाचे दुय्यम कर्ज | ४२८ | ४.४२ |
| ४. केंद्रीय कराकरिता केंद्र शासनाचे दुय्यम कर्ज | ४२८ | ४.४२ |
| ५. ठाणे महानगरपालिकेचे सहाय्य | २०० | २.०७% |
| ६. बहुपक्षीय द्विपक्षीय संस्थांचे अल्प व्याज दराचे कर्ज | ५६०६ | ५७.९३% |
| एकूण | ९६७६ | १००% |
| ७. भूसंपादन पुर्नवसाहतीकरण व पुर्नवसन या करिता राज्य शासनाचे दुय्यम कर्ज* (ठाणे महानगरपालिकेचे सहाय्य) | २७११ | -- |
| ८. राज्यस्तरीय कर | ६८७ | -- |
| ९. बांधकामाच्या कालावधीचे व्याज व प्रारंभिक शुल्क | २१ | -- |
| एकूण | १३०९५ | |

* राज्यशासनाचा समभाग व भूसंपादन पुर्नवसाहतीकरण व पुर्नवसन खर्च ठाणे महानगरपालिका स्वत:च्या निधीतुन करण्याचे प्रस्तावित आहे.

## परिशिष्ट -४

**ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत:-**

ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो मार्गाचे या प्रकल्पाकरीता इतर निधी उभारण्याचे स्रोत खालीलप्रमाणे नियोजित आहेत:-

अ. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्पाकडे वर्ग करणे.

ब. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार आकारण्यात राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करुन आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रातवसूल होणाऱ्या रक्कमेमधून उचित हिश्श्याची रक्कम सदर मेट्रो प्रकल्पाकडे वर्ग करणे.

क. महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३७ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १४९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. याद्वारे ठाणे महानगरपालिका क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून उचित हिश्श्याची रक्कम सदर प्रकल्पासाठी वर्ग करणे.

ड. मेट्रो कार डेपोच्या जागेचे वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

सदर विविध स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी हा राज्य शासनाच्या स्तरावर एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" ठेवण्याचे संकल्पित असून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठी लागणारी रक्कम सदर प्रकल्पासाठी वर्ग करण्याकरीता तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपूरा पडत असल्यास स्वतंत्र पूरक निधी उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

****